# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.11.2024** **वारःसोमवार**

---

1. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज प्रचारसभा
2. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस
3. पुढील पाच ते सात वर्षांत देशातील रेल्वे प्रवासात अभूतपूर्व बदल होणार : केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन आणि
4. फलंदाजांच्या हाराकिरीमुळे भारताचा न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीत पराभव.

**झारखंड**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या उमेदवारांना पाठिंबा देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज झारखंडमध्ये दोन निवडणूक प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. गढवा इथं सकाळी 11.30 वाजता तर दुपारी 3 वाजता चाईबासा इथं पंतप्रधानांच्या जाहीरसभा होणार असल्याची माहिती, झारखंड भाजपचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री बाबूलाल मरांडी यांनी दिली आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर झारखंडमध्ये पंतप्रधान मोदींची ही पहिलीच निवडणूक सभा आहे. राज्यात 13 आणि 20 नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात मतदान होत आहे.

**मोदी महादौरा**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी 8 ते 14 नोव्हेंबर दरम्यान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. या दौऱ्यात मोदी 11 सभांना संबोधित करणार असून 8 नोव्हेंबरला धुळे आणि नाशिक, 9 नोव्हेंबरला अकोला आणि नांदेड, 12 नोव्हेंबरला चंद्रपूर, चिमूर, सोलापूर आणि पुणे तर 12 नोव्हेंबरला संभाजीनगर आणि नवी मुंबई आणि मुंबई इथं 14 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणूक सभांचा समावेश असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

**महाराष्ट्र-निवडणूक**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची आज शेवटची तारीख आहे. छाननीनंतर 288 विधानसभा मतदारसंघातील 7 हजार 73 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. नवीन विधानसभेसाठी राज्यात या महिन्याच्या 20 तारखेला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. प्रामुख्याने, सत्ताधारी महायुती आणि विरोधक महाविकास आघाडी या प्रमुख आघाड्यांमध्ये सत्तेसाठी चुरस दिसून येत आहे. असं असलं तरी, काही छोटे पक्ष आणि अपक्ष देखील निवडणूक रिंगणात आहेत.

**क्षयरोग निर्मूलन**

भारताने 2015 ते 2023 या आठ वर्षांच्या कालावधीत देशातील क्षयरोगाचं प्रमाण सुमारे 17 टक्क्यांनी कमी करण्यात यश मिळवलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, क्षयरोगाचा प्रसार कमी करण्यासाठी देशाने केलेल्या प्रयत्नांचं कौतुक केलं आहे. 'क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये झालेली घट हे भारताच्या समर्पित आणि अभिनव प्रयत्नांचे फलित आहे.

सामूहिक भावनेच्या माध्यमातून, आपण क्षयरोगमुक्त भारतासाठी कार्य करत राहू.' असं पंतप्रधानांनी समाजमध्यमांवरील संदेशांत म्हंटलं आहे.

**कुंभमेळा**

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांना महाकुंभ मेळयासाठी आमंत्रित केले आहे. पौष पौर्णिमा स्नानाने महाकुंभाची सुरुवात होत आहे. 13 जानेवारी 2025 पासून हा कुंभमेळा सुरू होत असून या उत्सवाची सांगता 26 फेब्रुवारी 2025 रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी शेवटच्या स्नानाने होणार आहे.

**सौरऊर्जा**

आंतरराष्ट्रीय सौर भागीदारांची सातवी परिषद आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं सुरू होणार आहे. यामध्ये सदस्य देशांना सौरऊर्जा आणि त्याच्या स्वीकारार्हतेला गती देण्यासाठी तसेच वित्तपुरवठा व्यवस्था करण्याच्या मुद्द्यावर चर्चा केली जाणार आहे. भारत आणि फ्रान्स या परिषदेचं संयुक्तपणे अध्यक्षपद भूषवत आहेत.

**जयशंकर-ऑस्ट्रेलिया**

केंद्रीय परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून, काल त्यांनी क्वीन्सलँड विद्यापीठाचे चॅन्सेलर पिटर व्हर्गिस यांची ब्रिस्बेन इथे भेट घेतली. या भेटीदरम्यान, शैक्षणिक आणि संशोधन सहकाऱ्याच्या आदान-प्रदानाबाबत विचारविनिमय करण्यात आला असं जयशंकर यांनी समाज मध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे.

**भाऊबीज**

देशभरात भाऊबीजेचा सण काल मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या. या सणामुळं भावाबहिणींमधलं प्रेम अधिक घट्ट होईल, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**वैष्णव**

नवीन तंत्रज्ञान, रेल्वेसाठी आधुनिक घटक आणि आगामी वर्षात पूर्ण हॉट असलेलं रेल्वेचं विद्युतीकरण यामुळे येत्या पाच ते सात वर्षांत देशातील रेल्वे प्रवासात अभूतपूर्व बदल होणार असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. ते काल कोझिकोडमध्ये एका कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अमृत भारत स्टेशन पुनर्विकास योजनेंतर्गत, 1 लाख कोटी रुपये खर्चून 1334 स्थानकांचा पुनर्विकास केला जात असून त्यापैकी 1100 स्थानकांमध्ये बांधकाम प्रगतीपथावर असल्याचं वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. देशातील सर्जन्यतेच्या मदतीने, देशाच्या विविध भागांमध्ये भारतीय नवोपक्रम तंत्रज्ञान संस्थेची निर्मिती करण्याचा सरकारचा विचार असल्याचं वैष्णव यावेळी म्हणाले.

**जम्मू आणि काश्मीर -अध्यक्ष**

जम्मू आणि काश्मीर विधानसभेसाठीच्या नव्या अध्यक्ष निवडीसाठी आज बैठक होणार आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री अब्दुल रहीम राथेर यांचे नाव यासाठी प्रस्तावित करण्यात आलं आहे. विधानसभा सचिवालयाच्या कामकाजानुसार सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठक होणार आहे. नॅशनल कॉन्फरन्सकडे 41 आमदार असून 90 सदस्यांच्या विधानसभेत मित्रपक्ष काँग्रेसचे 6 आणि सीपीआय-एमकडे एक आमदार असल्याने ही निवड सोपी होण्याची शक्यता आहे. नॅशनल कॉन्फरन्सने उपाध्यक्ष पदासाठी भाजपकडे

विचारणा केली आहे. भाजपने नरेंद्र सिंह यांची या पदासाठी निवड केली आहे. अध्यक्षांच्या निवडीनंतर उपराज्यपाल मनोज सिन्हा यांचे अभिभाषण होणार आहे.

**<u>शिंदे</u>**

मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध असल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. ते काल मुंबईत एका प्रचारसभेत बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले की, महायुती सरकार महानगर झोपडपट्टीमुक्त करेल आणि गरिबांना शहरात परवडणारी घरे मिळतील याची काळजी घेईल. एक लाख लोकांच्या फायद्यासाठी मुख्यमंत्री मदत निधीतून 350 कोटी रुपये वितरित करण्यात आले असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितलं. आपले सरकार गरीब समर्थक असल्याचे सांगून ते म्हणाले की झोपडपट्टीतील रहिवाशांना मालकीची घरे उपलब्ध करून देणे हे त्यांच्या सरकारचे उद्दिष्ट आहे. लाडकी बहीण योजनेवर आक्षेप घेतल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवरही टीका केली आणि ही योजना बंद करण्याच्या विरोधकांच्या योजनेबद्दल त्यांनी सावध केले.

**<u>योगी-धमकी</u>**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तिला मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. 10 दिवसांच्या आत पदउतार न झाल्यास, राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी यांच्याप्रमाणेच योगी आदित्यनाथ यांची हत्या होऊ शकते असा धमकीवजा इशारा त्यांना देण्यात आला होतं. मुंबई वाहतूक पोलिस नियंत्रण कक्षाला योगी आदित्यनाथ यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली होती.

**<u>अमेरिका-निवडणूक</u>**

अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी अवघे दोन दिवस उरले असून प्रचाराचा जोर वाढला आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांनी काल पेनसिल्व्हेनियासह प्रमुख राज्यांमध्ये प्रचारसभा घेतल्या. या निवडणुकीत नेवाडा, ॲरिझोना, नॉर्थ कॅरोलिना, जॉर्जिया, विस्कॉन्सिन, मिशिगन आणि पेनसिल्व्हेनिया ही सात राज्ये निर्णायक भूमिका बजावतील.

**<u>बॉक्सिंग</u>**

भारताने अमेरिकेतल्या कोलोरॅडो इथं झालेल्या 19 वर्षाखालील जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेत पुरुष आणि महिलांच्या गटात चार सुवर्णांसह 17 पदके मिळवली. 19 बॉक्सर, 9 पुरुष आणि 10 महिला असलेल्या भारतीय संघात 12 खेळाडू अंतिम फेरीत पोहोचले, प्रत्येक महिला बॉक्सरने पदक जिंकले. चार सुवर्णपदक विजेत्यांमध्ये एकमेव पुरुष खेळाडू हेमंत सांगवान आणि महिला खेळाडू क्रिशा वर्मा, पार्थवी ग्रेवाल आणि वंशिका गोस्वामी यांचा समावेश होता.

**<u>हॉकी</u>**

पुरुषांच्या 14 व्या राष्ट्रीय वरिष्ठ हॉकी अजिंक्यपद स्पर्धेला आजपासून चेन्नईतील मेयर राधाकृष्णन हॉकी क्रीडांगणावर सुरुवात होत आहे. 16 नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत 31 संघ सहभागी होत आहेत. साखळी स्वरूपात खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीतील सामने 13 नोव्हेंबरला, उपांत्यफेरीतील सामने 15 नोव्हेंबरला तर अंतिम सामना 16 नोव्हेंबर रोजी होणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारतीय क्रिकेट संघातील वरच्या फळीतील फलंदाजांच्या हाराकिरीमुळे भारताला 24 वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमवावी लागली. 2000 नंतर पहिल्यांदा भारतीय संघाला देशात झालेल्या कसोटी मालिकेतला एकही सामना जिंकला आलेला नाही. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या

मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा 25 धावांनी पराभव केला, आणि मालिका 3-0 अशी जिंकली.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी काल सकाळच्या सत्रात न्यूझीलंडचा दुसरा डाव 174 धावांवर आटोपला. रविंद्र जडेजानं दोन्ही डावांत प्रत्येकी 5 गडी बाद करत, सामन्यात एकंदर 10 बळी घेतले. भारतासमोर विजयासाठी 147 धावांचं आव्हान होतं. मात्र न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांसमोर भारताची फलंदाजी कोलमडल्याने भारताचा दुसरा डाव 121 धावांत संपुष्टात आला. 64 धावा करणाऱ्या ऋषभ पंतशिवाय कोणत्याही फलंदाजाला खेळपट्टीवर तग धरता आला नाही. न्यूझीलंडच्या एजाज पटेल यानं दुसऱ्या डावात भारताचे 6 गडी बाद करत सामन्यात 11 बळी टिपले. पटेल सामनावीर तर न्यूझीलंडचा संयमी फलंदाज विल यंग मालिकावीर ठरला.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.